# ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, वर्धा.

दुरध्वनी क्र. 07152-252288 ई मेल -eebnwardha@gmail.co

जिल्हा परिषद, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, जिल्हा परिषद, वर्धा, 442001


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.जिपव/ग्रापापुवि/स्था-2/वशि- /2025 दिनांक / /2025

## सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने घेणेबाबत जाहिरात प्रारूप

१. सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकर्णी : २७१५/प्र.क.-१००/१३ दिनांक १७ डिसेंबर-२०१६ तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक भुजल-१८१८/प्र.क्र. २८७/पापु-१५ दिनांक ११/१२/२०१८ अन्वये सेवा निवृत्त भुवैज्ञानिक (गट-ब) अधिका-यांच्या सेवा करार पद्धतीने पाणी टंचाईकरीता (दिनांक 01/03/२०२५ ते 28/02/२०२६ पर्यंत) घ्यावयाचे आहेत. जिल्हा परिषद, वर्धा अंतर्गत भुजल सर्वेक्षण व अनुषंगीक कामे (Empanelment) करण्यासाठी पात्र सेवानिवृत्त भूवैज्ञानिक (गट-ब) अधिका-यांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. करार पध्दतीने नियुक्त करावयाचे सेवानिवृत्त अधिका-यांची संख्या पुढील प्रमाणे

| अ.क्र. | विभागाचे नाव | एकुण पदे | विभागातील कार्यालय निहाय पदे |
|---|---|---|---|
| १ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, वर्धा | ०१ | सहायक भुवैज्ञानिक |

३. उपरोक्त पदांसाठी अर्जाचा नमुना, अर्हता, अनुभव, वयोमर्यादा, मासिक देय पारिश्रमिक, कामाचे स्वरूप तसेच इतर अटी व शर्ती निवड प्रक्रिया याबाबत सविस्त्र तपशिल https://www.zpwardha.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

४. इच्छुक सेवानिवृत्त पात्र अधिका-यांनी उक्त संकेत स्थळावरील जाहिरातीचा व सुचनांचा बारकाईने अभ्यास करून आपला विहीत नमुन्यातील अर्ज कागदपत्रांसह दिनांक 20/02/२०२५ पर्यंत रोजी सायंकाकाळी ५.०० वाजपर्यंत वरील कार्यालयाच्या पत्यावर पोष्टाने किंवा प्रत्यक्ष सादर करावा. विहीत वेळेनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाही. अपूर्ण स्वरूपातील अर्ज व अटीची पुर्तता न करणारे अर्ज करार पध्दतीने नियुक्तीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. यापूर्वी अर्ज केले असल्यास नव्याने अर्ज करावेत.

(धिरज परांडे)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद, वर्धा

(जितीन रहमान, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, वर्धा

# भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतली सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पध्दतीने कामावर नेमणुकीबाबत अटी व शर्ती.

- सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासननिर्ण क्रमांक संकीर्ण : २७१५/प्र.क्र.-१००/१३ दिनांक १७ डिसेबर-२०१६ तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक भुजल १८१८/प्र.क्र.२८७/पापु-१५ दिनांक ११/१२/२०१८ व वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक पदनि २०१८/प्र.क्र.११३/आपुका दिनांक ११/१२/२०१८ अन्वये सेवा निवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याचे निर्देश आहेत. भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील टंचाईग्रस्त जिल्हयातील भुजल सर्वेक्षण व तदअनुषंगीक कामे (विषय निहाय Empanelment करून) पार पाडण्यासाठी पात्र सेवानिवृत्त अधिका-यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.
- विवक्षित कामाचे स्वरूप

  अ) भुजल सर्वेक्षणाची कामे करणे.

  ब) भुजल संदर्भात तांत्रिक अहवाल सादर करणे.

  क) कार्यालय प्रमुखांनी सोपविलेली कामे पार पाडणे.
- कामाचा कालावधी

  सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय संकीर्ण : २७१५/प्र.क्र.-१००/१३ दिनांक १७ डिसेबंर -२०१६ अन्वये सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारा नियुक्तीचा कालावधी दिनांक01/03/२०२५ ते28/02/ /२०२६ पर्यंत राहील.
- देय मासिक व परिश्रमीक व भत्ते

  सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासननिर्ण क्रमांक संकीर्ण : २७१५/प्र.क्र.-१००/१३ दिनांक १७ डिसेबर-२०१६ ड मधील १ अन्वये राहील.
- नामीकासुचीची वैधता

  प्राप्त अर्जातुन पात्र उमेदवाराची निवड करून नामिकासुची (Panel) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी तयार करतील. सदर नामीका सुचितील व्यक्तीमधुनच करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येईल. सदर नामीका सुचीची वैधता जास्तीत जास्त ३ वर्ष राहील, तसेच त्या सुचीचा वार्षिक आढावा घेण्यात येईल.
- बंधपत्र / हमीपत्र.

  नियुतीच्या कालावाधीत करार पध्दतीने विवक्षिती कामे पुर्ण करण्याची जबाबदारी संबधित व्यक्तीची राहील. अशा आशयाचे बंधपत्र/हमीपत्र संबधित अधिकारी याना सादर करावे लागेल. तसेच बंधपत्रात हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासनाने सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र.-१००/१३ दिनांक १७ डिसेबंर-२०१६ अन्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती तसेच विभागाने निशिचत केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच करार पध्दतीने नियुक्त् करण्यात आलेल्या व्यक्तीकडुन नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही. याचा उल्लेख आश्याचे असलेल्या बंधपत्र/हमीपत्र सादर करावे लागेल.
- वयोमर्यादा.

  करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या 65 वर्षापर्यतच कार्यरत राहु शकतील. म्हणजेच कमाल 64 वर्ष वय असलेले उमेदवार अर्ज करणयास पात्र राहील.

- **अर्हता व अनुभ्व.**

  अ)शासकिय यंत्रणेमधुन भुवैज्ञानिक पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा.

  ब)विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबधित कामाचा तिन वर्ष अनुभव आवश्यक आहे.

  क)करार पध्दतीने नियुक्त करावयाचे सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावेत तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांचेकडे आवश्यक क्षमता असावी. (नोदणीकृत शासकिय डॉक्टरचे स्वास्थ् प्रमाणपत्र जोडावे.)

  ड)करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांचे विरूध्द कोणतेही विभागीय चौकशी चालु किंवा प्रस्तावित नसावी, किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसेल असेच अधिकारी करार पध्दतीने नियुक्तीसाठी पात्र आहेत.

- **इतर अटी व शर्ती**

  १. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशन/समावुन घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभा मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

  २. नियुक्ती साठी समक्ष प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करु शकतील.

  ३. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

  ४. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबध (Conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

  ५. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

  ६. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्या सोपविलेली कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा धेऊन कामाचे मुल्यामापन करतील.

  ७. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

(धिरज परांडे)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद, वर्धा

(जितीन रहमान, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, वर्धा

# अर्जाचा नमुना

## करार पध्दतीने सहायक भुवैज्ञानिक पदासाठी करावयाचा अर्ज

| कार्यालयीन उपयोगासाठी<br>अर्ज क्रमांक -<br><br>अर्ज प्राप्त दिनांक - | | पासपोर्ट साईज<br>फोटो |
|---|---|---|

१. उमेदवाराचे संपुर्ण नांव ------------------------------
२. वडीलांचे/ पतीचे नांव - ------------------------------
३. जन्मतारीख ------------------------------
४. सेवानिवृत्तीची तारीख व कार्यालय ------------------------------
५. वय (१/०१/२०२५रोजीचे) ------------------------------
६. कायमचा पत्ता ------------------------------
७. पत्र व्यव्हाराचा पत्ता ------------------------------
८. संपर्क क्रमांक ------------------------------

मोबाईल क्रमांक /दुरध्वनी क्रमांक ई-मेल आयडी

९. लिंग (पुरुष/स्त्री)
१०. अनुभव

| अ. क्र. | काम केलेली संस्था/ कार्यालयाचा पत्ता | पदाचे नांव | कामाचा कालावधी | | वेतन रुपये |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| | | | | | |
| | | | | | |

११. सेवानिवृत्ती होण्यापुर्वी धारण केलेल्या पदाचे व कामाचे स्वरुप
१२. शेवटच्या वेतनाचा तपशिल-वेतन बॅड मधील वेतन ----------+ग्रेड वेतन-----------
१३. मंजुर केलेले सेवानिवृत्तीवेतन (P.P.O प्रत जोडवी) ------------------------------

### प्रतिज्ञापत्र

मी, असे प्रमाणित करतो/ करते की, आपले कार्यालयातील तांत्रिक तंज्ञ/तांत्रिक समन्वयक या पदाची जाहिरात काळजीपुर्वक वाचली सदर जाहिरातीतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत तसेच अर्जामध्ये दिलेल्या माहिती खरी असुन जर वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळुन आल्यास माझी यापदासाठी उमेदवारी रद्द होईल याबदल निवड समिती/नियुक्ती अधिकारी यांचा निर्ण्य मला बंधनकरारक राहील.

आपला/ आपली विवासु

अर्जदाराची सही

नावं ----------------------------

ठिकाण :
दिनांक :